
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार, 17 मे 2026 | अंक क्र. 354 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# नाशिकमध्ये दिवसाढवळ्या दागिन्यांच्या दुकानात दरोडा; महिला भिडली बंदूकधारी गुन्हेगारांशी

■ नाशिक वृत्तसंस्था

नाशिक जिल्ह्यात शनिवारी एका दागिन्यांच्या दुकानात झालेल्या दरोड्याच्या प्रयत्नामुळे परिसरात घबराट पसरली. सशस्त्र गुन्हेगारांच्या एका गटाने दुकानात घुसून गोळीबार केला आणि एक जण जखमी झाला. ही घटना नाशिकच्या पंचवटी भागातील हिरावाडी रोडवरील समृद्धी ज्वेलर्समध्ये घडली. प्राथमिक माहितीनुसार, पाच ते सहा समाजकंटक दोन मोटरसायकलवरून दुकानात आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, सर्व आरोपी शस्त्रधारी होते. दुकानात शिरल्यानंतर त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या लोकांना धमकावले. गोळीबार झाला आणि बंदुकीच्या दस्त्याने एका व्यक्तीला मारल्याने तो जखमी झाला. जखमीवर रुग्णालयात उपचार सुरू जखमी व्यक्तीला तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या मते, त्याची प्रकृती सध्या स्थिर आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. या व्हिडिओमध्ये गुन्हेगार शस्त्रधारी होऊन दुकानात शिरताना दिसत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी ही संपूर्ण घटना अवघ्या काही मिनिटांतच पार पाडली आणि घटनास्थळावरून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच, पंचवटी पोलीस ठाण्यातील एक पथक, वरिष्ठ अधिकारी आणि मोठा पोलीस बंदोबस्त घटनास्थळी दाखल झाला आहे. न्यायवैद्यक पथकानेही घटनास्थळावरून पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे.




**पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू**

पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. आरोपीची ओळख पटवण्यासाठी जवळपासच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. संपूर्ण शहरात नाकाबंदी करण्यात आली असून, पोलिसांची अनेक पथके संशयितांचा शोध घेत आहेत. त्यांना लवकरच अटक केली जाईल, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.



## NEET पेपरफुटीवरून राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल; शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

■ नवी दिल्ली | वृत्तसंस्था :

नीट (NEET) परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे तब्बल 22 लाख विद्यार्थ्यांची मेहनत वाया गेल्याचा आरोप त्यांनी केला.

राहुल गांधी यांनी व्हिडिओ निवेदनाद्वारे म्हटले की, नीट परीक्षेच्या दोन दिवस आधीच प्रश्नपत्रिका व्हॉट्सअ‍ॅपवर वितरित होत असल्याची माहिती संपूर्ण देशाला होती. मात्र, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान या प्रकरणाशी आपला काहीही संबंध नसल्याचे सांगत आहेत, ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले की, संसदीय समितीने शिक्षण व्यवस्थेबाबत काही महत्त्वाच्या शिफारसी केल्या होत्या. मात्र, समितीत विरोधी पक्षाचे सदस्य असल्याचे कारण देत सरकारने त्या शिफारसी कचरापेटीत टाकल्या. राहुल गांधी यांनी आरोप केला की, केंद्र सरकारच्या धोरणांमुळे देशाच्या शिक्षण व्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. "विद्यापीठे, कुलगुरू आणि प्राध्यापक पदांवर आरएसएस-भाजप विचारसरणीच्या लोकांची नियुक्ती करून शिक्षण व्यवस्थेचा पाया कमकुवत करण्यात आला आहे. या साठगाठीमुळे देशातील शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त होत आहे," असा गंभीर आरोप त्यांनी केला. या प्रकरणामुळे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण असून, नीट परीक्षेतील गैरव्यवहारावर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

## महाराष्ट्र पोलीस दलात सलग दुसऱ्या दिवशी फेरबदल ; 7 वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ मुंबई : वृत्तसंस्था

महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाने शुक्रवारी (15 मे) भारतीय पोलीस सेवेतील (IPS) 53 वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदोन्नतीचे आदेश जारी केले असून, याद्वारे राज्य पोलीस दलात मोठे प्रशासकीय फेरबदल केले होते. यानंतर आज (16 मे) सलग दुसऱ्या दिवशी पुन्हा एकदा राज्य पोलीस दलात फेरबदल करण्यात आले असून सात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत.

शुक्रवारी करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बदलांनंतर गृह विभागाने आज आणखी एक बदली आदेश जारी केला आहे. या आदेशाद्वारे भारतीय पोलीस सेवा (IPS) आणि राज्य पोलीस सेवा (SPS)




मधील अनेक महत्त्वाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदांवरून कार्यमुक्त करण्यात आले आहे. तथापि, सरकारने या अधिकाऱ्यांच्या नवीन नियुक्तींबाबत अद्याप कोणतीही घोषणा केलेली नाही. या आदेशात असे नमूद करण्यात आले आहे की, या सर्व अधिकाऱ्यांना नवीन जबाबदाऱ्या नंतरच्या टप्प्यावर स्वतंत्रपणे सोपवण्यात येतील.

बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये अमली पदार्थ विरोधी पथकाच्या (Anti-Narcotics Cell) विशेष पोलीस महानिरीक्षक (IGP) शारदा राऊत आणि मुंबई सशस्त्र पोलीस दलाच्या अतिरिक्त पोलीस आयुक्त विनिता साहू यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या यादीत मुंबई एटीएसच्या (ATS) पोलीस अधीक्षक (SP) शीला सैल; पोलीस महासंचालकांच्या कार्यालयात कार्यरत असलेले सहायक पोलीस महानिरीक्षक प्रकाश जाधव, मुंबई पोलीस दलातील पोलीस उपायुक्त (DCP) दत्तात्रय कांबळे आणि पिंपरी-चिंचवडचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांचाही समावेश आहे. तसेच जालना येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले अशोक बनकर यांचाही या यादीत समावेश आहे.

# 'हिंदकेसरी'च्या मानाच्या गदेवर कोणाची मोहोर उमटणार?

■ सातारा ( वृत्तसंस्था ) -

साताऱ्यातील लाल मातीत तब्बल २२ वर्षांनंतर रंगलेल्या मानाच्या राष्ट्रीय हिंदकेसरी कुस्ती स्पर्धा आता निर्णायक टप्प्यात पोहोचल्या आहेत. उद्या होणाऱ्या अंतिम लढतीच्या पार्श्वभूमीवर शाहू स्टेडियम परिसरात कुस्तीमय वातावरण निर्माण झाले असून, देशभरातील कुस्तीप्रेमींचे लक्ष या अंतिम सामन्याकडे लागले आहे.

गेल्या तीन दिवसांपासून रंगलेल्या चित्तथरारक डावपेचांमुळे प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. हिंदकेसरीच्या गदेवर यंदा कोणाचे नाव कोरले जाणार, याबाबत राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती वर्तुळात प्रचंड उत्सुकता आहे. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणारा अंतिम सामना कुस्तीप्रेमींसाठी पर्वणी ठरणार आहे.

पुरुष आणि महिला अशा दोन्ही गटांतील स्पर्धांमध्ये महाराष्ट्रासह हरियाणा, दिल्ली, बिहार, गुजरात आदी राज्यांतील मल्लांनी जोरदार झुंज दिली. विशेषतः ७५ आणि ८० किलो वजनी गटांतील सामने अत्यंत रंगतदार ठरले. महाराष्ट्राचा आक्रमक मल्ल युवराज खोपडे याने दमदार खेळी करत आपला दबदबा कायम ठेवला.

अंकुश पवारसह इतर मल्लांनीही पुढील फेरी गाठत हिंदकेसरीच्या गदेवरील दावा मजबूत केला आहे. महिला गटातही तितकीच चुरस पाहायला मिळाली. पुण्याच्या सिद्धी होळकर हिने बिहारच्या रोमा कुमारीवर मात करत आपली ताकद दाखवली. सांगलीच्या अपेक्षा पाटीलने गुजरातच्या वर्षी पाटीलला धूळ चारली. दिल्लीच्या खुशी दलालने कोल्हापूरच्या सृष्टी भोसलेवर विजय मिळवत अंतिम फेरीकडे वाटचाल केली. संजना राठोड, प्रीती यादव आणि मोनू (हरियाणा) यांच्या खेळीनेही प्रेक्षकांची मने जिंकली. धोबीपछाड, छडी टांग, भारत लंगडीसारखे पारंपरिक डाव पाहताना शाहू स्टेडियममधील उपस्थित कुस्तीशौकिन भारावून गेले.

**मान्यवरांच्या हस्ते होणार गदेचे वितरण**

**हिंदकेसरीची अंतिम लढत रविवारी, दि. १७ रोजी सायंकाळी सहा वाजता रंगणार आहे. त्यानंतर मानाच्या चांदीच्या गदेचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, पालकमंत्री शंभूराज देसाई, खासदार उदयनराजे भोसले यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित राहणार असल्याने या सोहळ्याची उत्सुकता अधिकच वाढली आहे.**

**शाहू स्टेडियममध्ये अंतिम लढतीची उत्कंठा शिगेला;**

**देशभरातील कुस्तीप्रेमींचे लागले लक्ष**



# संपादकीय

## मराठी बोलायची कोणी?

अभिजात भाषेचा मान मिळवूनही आज मराठी आपल्याच घरात पोरकी होतेय की काय, अशी भीती वाटू लागली आहे. रिक्षा-टॅक्सीचालकांनी मराठी बोललं पाहिजे ही मागणी कायदेशीररीत्या योग्यच आहे, पण जेव्हा दोन मराठी माणसं एकमेकांशी हिंदीत संवाद सुरू करतात, तेव्हा त्या मागणीतील धार कमी होते.

राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मेपासून केलेला मराठी सक्तीचा निर्णय सध्या मत-मतांतरांनी गाजतो आहे. या निर्णयाला कायदेशीर आधार असल्याने त्याला थेट विरोध करणं कोणालाही अडचणीचंच आहे. त्यामुळे, वेगवेगळी खुस्पटं काढून त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय पक्षांमध्ये या निर्णयाला विरोध शिवसेनेतूनच झाला आहे. शिवसेनेतील अमराठी, उत्तर भारतीय नेते संजय निरुपम यांना प्रकाशझोतात येण्यासाठी हे चांगलं निमित्त मिळालं. यात दोन गंमती आहेत. मूळ निर्णय परिवहन विभागाचा आहे. त्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. त्यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उभे राहिलेले पहिले नेते निरुपमही त्याच पक्षाचे आहेत!

निरुपम मूळ पत्रकार. ते मुंबईत राजकीय क्षितिजावर उगवले ते पूर्वीच्या, म्हणजे मूळ शिवसेनेतून. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतानाच. दोन वेळा खासदारकी झाल्यानंतर ते काँग्रेसवासी झाले. तिथून पुन्हा विभाजित शिवसेनेच्या, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले. सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी त्यांनी काल दहिसर गाठलं. तिथे त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांशी गाठ पडली. त्यातून जो गोंधळ व्हायचा, तो झाला. रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी मराठीसक्तीचा मुद्दा त्यामुळे वादाचा झाला. मनसेने आता साहजिकच त्यात पुढाकार घेतला आहे. 'महाराष्ट्रात मराठीचं भवितव्य' हा चिंतेचा विषय आजचा नाही. दशकानुदशके या विषयावर चर्वितचरण सुरू आहे. मराठीची पीछेहाटही अव्याहत सुरू आहे!! दरम्यानच्या काळात मोठा जोर लाऊन, राजकीय परिस्थितीचा फायदा उठवून महाराष्ट्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवला. हा दर्जा देणं केंद्राचं काम होतं. महाराष्ट्राच्या सरकारने ते केंद्राला करायला लावलं. पण, हा दर्जा मिळाल्यानंतर मराठीसाठी काही भरीव करायला हवं होतं ना? दोन-चार संशोधन प्रकल्प तरी सुरू व्हायला हवे होते. निदान मुंबईतल्या 'मराठी भाषा भावना'चं काय? हा प्रश्न विचारायला हवा होता. ते कोणी केलं का? आपली भाषा दुसऱ्याच्या माथी मारून त्यातून मातृभाषेचा विकास होईल, हा समज खरोखरच अजब आहे!

भाषावार प्रांतरचनेच्या मूळ उद्देशाला धरून प्रत्येक प्रांतात तिथल्या राज्य भाषेचा वापर आणि विकास झाला पाहिजे, यात कोणाचंच दुमत नाही. कोणी याला विरोध करत असेल, तर त्याला तिथल्या तिथे या देशाच्या रचनेची जाणीव करून दिली पाहिजे. पण, आपली राज्यभाषा, आपली मातृभाषा जपण्याची, तिची प्रतिष्ठा वाढवण्याची, तिच्यात वेळोवेळी भर घालण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक समूहांची असते. महाराष्ट्रात ही जबाबदारी मराठी भाषकांची आहे. त्यांनी व्यवहारात मराठी वापरली, तरच अन्य भाषकही आपसूक मराठी वापरतील. मराठी वापराची ही सुरुवात मराठी माणसानेच करायला हवी. ती त्याची जबाबदारी आहे. परप्रांतीय, अमराठी भाषकांची नाही. मुंबई ही साऱ्या देशाचं पोट भरणारी नगरी असल्याने इथे संपूर्ण देशातून लोक येत राहतात. वर्षानुवर्षं हे सुरू आहे. त्यामुळे, अन्य प्रांतातून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांच्याही आता तीन - चार पिढ्या इथे नांदल्या आहेत. कायदेशीर भाषेत तेही 'महाराष्ट्रीय'च आहेत. तरीही अशा कुटुंबातल्या अनेकांना व्यवहारापुरतीही नीट मराठी येत नाही, हा दोष कुणाचा? त्यात त्यांचा वाटा तर आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक त्यांना मराठी बोलणं, मराठी भाषेतून व्यवहार करणं अपरिहार्य न करणाऱ्या इथल्या स्थानिकांचा; म्हणजे मराठी माणसांचा आहे. बॉलिवूडचं केंद्र मुंबई असल्याने म्हणा, देशाची आर्थिक राजधानी ठरल्याने म्हणा, मराठी आणि हिंदीची लिपी एक असल्याने म्हणा, मराठी माणसाच्या न्यूनगंड म्हणा, की अतिभिडस्त स्वभाव म्हणा; पण मराठी माणूस मुंबईत सार्वजनिक ठिकाणी आपोआप हिंदी भाषेत शिरतो, हे ढळढळीत सत्य आहे. लोकल ट्रेनमध्ये सर्व अन्य भाषक आपल्या स्नेह्यांशी फोनवर किंवा अगदी आपसातही तारस्वरात मातृभाषेत बोलतात. सर्रास दिसणाऱ्या या दृश्यात मराठी माणूस तसा बोलताना कधी दिसतो का? दोन अनोळखी मराठी माणसंही आपला संवाद बहुतेकदा हिंदी किंवा इंग्रजीतूनच सुरू करतात. हा दोष कुणाचा? सेमी इंग्लिशचा पुरस्कार करूनही मराठी पालक आपल्या मुलांना शुद्ध इंग्रजी शाळेत घालण्यासाठी जीवाचा आटापिटा करतात. का? कारण, त्यांच्या नेत्यांची, साहित्यिकांची, अभिजात वर्गातली मुलं त्याच शाळेत शिकतात. मराठीतली नवी पिढी मराठीपासून अशी तुटली आहे, हे खरं ना? सामान्य मराठी माणसाने मराठी सण-उत्सव जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. आता मराठी भाषा जगवण्याची जबाबदारीही त्यानेच घ्यायला हवी का? ते होत नाही, म्हणून भाषा जगवण्यासाठी तिचा असा विस्तार करायचा आहे का?

मुळात वाहनचालक ज्या राज्यात परवाना घेत असेल, त्या राज्याची भाषा किमान स्वरूपात त्याला यायलाच हवी, असा नियम आहे. महाराष्ट्रात २०११ मध्येच त्याचा अंतर्भाव झाला आहे. त्याची कडक, अनिवार्य अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकारने आता भूमिका घेतली आहे आणि ती योग्यच आहे. मध्य मुंबईतले अमराठी दुकानदार चांगली मराठी बोलतात. कारण, ती त्यांची व्यावसायिक गरज आहे. सर्व मराठीबहुल भागात हा अनुभव येईल. मुंबईने मराठी बोलावं असं वाटत असेल, तर मुंबईच्या वातावरणात मराठी पाहिजे. कानावर सतत मराठी पडली पाहिजे. परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालक इथे निव्वळ पोट भरायला आले आहेत. मराठीचा दुःस्वास करायला नाही. पोट भरण्यासाठी, व्यवसायासाठी जे आवश्यक, ते ते करतीलच. मराठीही बोलतील. अट एकच आहे, मराठी माणसाने त्याच्याशी मराठीत बोललं पाहिजे. दुसऱ्यावर सक्ती करण्यापूर्वी आपण आपल्यावरच ही सक्ती करायला हवी. तसं केलं तर, ना शासन निर्णयाची गरज भासेल, ना कुठल्या अटी - शर्तींची, ना आंदोलनाची!

# 'एल निनो'चा वाढता धोका; यंदाचा मान्सून ठरणार का अनिश्चित?

## हवामान खात्याच्या अहवालाने वाढवली चिंता

पॅसिफिक महासागरातील तापमानवाढीचे संकेत अमेरिकेतील नॅशनल ओशन अँड अॅटमॉस्फेरिक अॅडमिनिस्ट्रेशन (NOAA) या संस्थेने नुकताच प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, मे ते जुलै या कालावधीत 'एल निनो' सक्रिय होण्याची शक्यता आता ८२ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. गेल्या महिन्यात हा अंदाज ६९ टक्के इतका होता. त्यामुळे यंदाच्या मान्सूनवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अहवालानुसार, सध्या पॅसिफिक महासागरातील पाण्याचे तापमान मे महिन्याच्या सुरुवातीच्या सरासरीपेक्षा ०.४ अंश सेल्सिअसने वाढले आहे. हे तापमान ०.५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले, तर 'एल निनो' अधिकृतरीत्या सक्रिय झाल्याचे मानले जाईल. हवामान तज्ज्ञांच्या मते, एल निनो सक्रिय झाल्यास भारतातील मान्सूनवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वाढते. विशेषतः पावसाचे प्रमाण कमी होणे, पावसाच्या आगमनात विलंब होणे किंवा वितरणात असमानता निर्माण होणे असे परिणाम दिसून येतात.



### १० वर्षांतील मान्सून आगमनाची आकडेवारी

- २०१६ मध्ये मान्सूनचा अंदाज ७ जून होता, प्रत्यक्ष आगमन ८ जूनला झाले.
- २०१७ मध्ये अंदाज ३० मे, आगमन ५ जून.
- २०१८ मध्ये अंदाज आणि प्रत्यक्ष आगमन २९ मे रोजीच झाले.
- २०१९ मध्ये अंदाज ६ जून, प्रत्यक्ष ८ जून.
- २०२० मध्ये अंदाज ५ जून, आगमन १ जून.
- २०२१ मध्ये अंदाज ३१ मे, आगमन ३० जून.
- २०२२ मध्ये अंदाज २७ मे, आगमन २९ मे.
- २०२३ मध्ये अंदाज ४ जून, आगमन ८ जून.
- २०२४ मध्ये अंदाज ३१ मे, आगमन ३० मे.
- २०२५ मध्ये अंदाज २७ मे, प्रत्यक्ष आगमन २४ मे रोजी झाले.
- हवामान विभागाच्या पुढील अंदाजाकडे आता शेतकरी, कृषी त

# मध्यपूर्वेतील तणावाचा महागाईवर परिणाम; पेट्रोल-डिझेलपासून दूध-गॅसपर्यंत दरवाढीचा फटका

## ऊर्जा संकटाचे सावट गडद; सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार मोठा ताण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षाचा परिणाम आता भारतातील सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर जाणवू लागला आहे. पेट्रोल-डिझेल, एलपीजी, सीएनजी, दूध, खाद्यतेल तसेच सोने-चांदीपर्यंत अनेक वस्तूंच्या किमती वाढल्याने महागाईचा फटका अधिक तीव्र होत आहे. ऊर्जा संकटामुळे येत्या काळात दैनंदिन गरजेच्या वस्तू आणखी महागण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

१५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांची वाढ करण्यात आली. या दरवाढीनंतर राजधानी दिल्लीत पेट्रोलचा दर ९७.७७ रुपये प्रति लिटर, तर डिझेलचा दर ९०.६७ रुपये प्रति लिटरवर पोहोचला आहे. याशिवाय, अमूल आणि मदर डेअरीने दुधाच्या दरात प्रत्येकी २ रुपये प्रति लिटर वाढ केली आहे. सीएनजीच्या दरातही प्रति किलो २ रुपयांची वाढ करण्यात आली असून दिल्ली-मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये याचा परिणाम दिसून येत आहे. दैनंदिन वस्तूंच्या किंमती आणखी वाढण्याची शक्यता इंधन दरवाढीचा थेट परिणाम मालवाहतूक, वितरण आणि उत्पादन खर्चावर होत असल्याने एफएमसीजी कंपन्यांवर मोठा दबाव निर्माण झाला आहे. त्यामुळे कंपन्या उत्पादनांच्या




किंमती वाढवण्याचा किंवा वस्तूंचे वजन कमी करण्याचा पर्याय स्वीकारू शकतात. आधीच ८ ते १० टक्के महागाईशी सामना करणाऱ्या कंपन्यांच्या नफ्यावर याचा परिणाम होणार आहे.

**होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्याचा फटका**

इराण-अमेरिका तणाव अद्याप कायम असून होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यामुळे मालवाहू जहाजांची वाहतूक विस्कळीत झाली आहे. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ४० टक्के, तर गॅसच्या गरजेपैकी ८० ते ९० टक्के पुरवठा आखाती देशांकडून आयात करतो. त्यामुळे पुरवठा साखळीवर परिणाम होऊन महागाईचा दबाव वाढत आहे. येत्या काही दिवसांत परिस्थिती सुधारली नाही, तर सर्वसामान्यांना आणखी महागाईचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.





# अमरावतीतील शिबिरात जिल्हाधिकाऱ्यांच्या मातोश्रींचा प्रेरणादायी सहभाग

## स्पर्धा परीक्षा संस्कार शिबिरात विद्यार्थ्यांना दिला यशाचा मंत्र; उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण

**अमरावती वृत्तसंस्था**

अमरावतीतील सुप्रसिद्ध डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीच्या वतीने 'मिशन आयएएस' रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा संस्कार शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सात दिवस चालणाऱ्या या शिबिरात राज्यभरातून विद्यार्थी सहभागी झाले असून, यंदाच्या शिबिराचे विशेष आकर्षण ठरल्या त्या जिल्हाधिकाऱ्यांच्या मातोश्री श्रीमती शारदाताई इटनकर. नागपूरचे माजी जिल्हाधिकारी तथा सध्या महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपिन इटनकर यांच्या मातोश्री श्रीमती शारदाताई इटनकर यांनी शिबिरात उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. श्रीमती शारदाताई इटनकर यांनी आपल्या मुलाच्या यशामागील संस्कार, परिश्रम आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा सल्ला दिला. "माझा मुलगा जसा जिल्हाधिकारी झाला, तसेच इतर मुलांनीही स्पर्धा परीक्षेत यश मिळवून देशसेवा करावी," असे त्या म्हणाल्या. डॉ. विपिन इटनकर यांनीही आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांनी दिलेल्या संस्कारांना देत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीने खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या सहकार्याने आयोजित केलेले हे शिबिर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. शिबिराचा समारोप २२ तारखेला सकाळी १० वाजता महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या हस्ते होणार असून, या कार्यक्रमाबाबत विद्यार्थी आणि आयोजकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# रुग्णसेवेतून समाजसेवेचा वसा जपणारे व्यक्तिमत्त्व : डॉ. विवेक दंडे



परळी वैजनाथ ही प्रभू श्री वैद्यनाथांच्या भक्तीने ओतप्रोत भरलेली नगरी जशी श्रद्धेचे केंद्र आहे, तशीच ती आरोग्यसेवेतील विश्वासाचेही प्रतीक बनली आहे. या विश्वासाला आपल्या सेवाभावी कार्यातून बळकटी देणारे नाव म्हणजे डॉ. विवेक दंडे. वैद्यकीय सेवा ही केवळ व्यवसाय नसून ती समाजसेवेची पवित्र जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून वेळोवेळी सिद्ध केले आहे.

आज दि. १७ मे रोजी डॉ. विवेक दंडे यांचा वाढदिवस साजरा होत असून, त्यानिमित्त त्यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्याचा घेतलेला हा गौरवपूर्ण आढावा आहे.

डॉ. विवेक दंडे यांना सेवाभावाची प्रेरणा त्यांच्या वडिलांकडूनच लाभली. स्वर्गीय डॉ. दिगंबर दंडे (दादा) हे परळीतील ज्येष्ठ, अनुभवी आणि अत्यंत आदरणीय डॉक्टर म्हणून ओळखले जात होते. त्यांनी आयुष्यभर रुग्णसेवेला माणुसकीची जोड दिली. त्यांचा हाच आदर्श आणि संस्कार डॉ. विवेक दंडे यांनी आपल्या जीवनात आत्मसात केला. त्यामुळे आज त्यांच्या रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला केवळ औषधोपचारच नव्हे, तर आत्मीयतेचा आणि विश्वासाचा स्पर्श अनुभवायला मिळतो.

आरोग्यसेवेबरोबरच सामाजिक व आर्थिक क्षेत्रातही त्यांनी आपले योगदान प्रभावीपणे नोंदवले आहे. दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे संचालक म्हणून कार्य करताना त्यांनी सामान्य नागरिकांच्या हिताला प्राधान्य देणारी भूमिका कायम ठेवली आहे. समाजाशी असलेली त्यांची बांधिलकी आणि संवेदनशील दृष्टिकोन यामुळे ते बँकिंग क्षेत्रातही आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून पाहिले जातात.

डॉ. विवेक दंडे यांचे संपूर्ण कुटुंबच समाजसेवेच्या मूल्यांनी प्रेरित आहे. त्यांचे कनिष्ठ बंधू प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. तेजस दंडे हे मुंबई उच्च न्यायालयात यशस्वी वकील म्हणून कार्यरत आहेत. आरोग्य आणि न्याय या समाजजीवनातील दोन महत्त्वाच्या क्षेत्रांतून सेवा देणारे हे कुटुंब म्हणजे संस्कार, मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचे प्रेरणादायी उदाहरण ठरते.

कोरोना महामारीच्या कठीण काळात, जेव्हा संपूर्ण जग भीतीच्या सावटाखाली होते, त्या वेळी डॉ. विवेक दंडे यांनी आपल्या रुग्णसेवेचा धागा कधीही तुटू दिला नाही. अत्यल्प साधनसामग्रीतही त्यांनी अनेक रुग्णांना दिलासा दिला, धीर दिला आणि जीवनासाठी लढण्याचे बळ दिले. त्यांच्या या समर्पित सेवेमुळे त्यांनी परळीच्या वैद्यकीय क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

रुग्णालयातील सेवेसोबतच त्यांनी विविध आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, जनजागृती मोहिमा आणि सामाजिक उपक्रम राबवून समाजाच्या आरोग्याची व्यापक जबाबदारीही स्वीकारली आहे. वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग केवळ उपचारापुरता न ठेवता जनहितासाठी कसा करायचा, याचे ते उत्तम उदाहरण आहेत.

डॉ. विवेक दंडे हे केवळ यशस्वी डॉक्टर नाहीत, तर संवेदनशील समाजसेवक, दूरदृष्टी असलेले नेतृत्व आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त करताना, परळी वैजनाथ नगरीसाठी त्यांनी दिलेले योगदान निश्चितच प्रेरणादायी आणि अभिमानास्पद असल्याची भावना व्यक्त करावी लागेल.

**— संतोष जुजगर**
**परळी वैजनाथ, मो. ९८६०८८६७३७**

# पश्चिम आशियाई संकट: महाराष्ट्र शासनाचे एक महत्त्वपूर्ण आणि धाडसी पाऊल...

सर्व राष्ट्रहितार्थम्...। सर्व काही राष्ट्रासाठी...!

सध्या संपूर्ण जगाचे लक्ष पश्चिम आशियातील वाढत्या तणावाकडे आणि अस्थिरतेकडे लागले आहे. या जागतिक संकटामुळे उद्भवू शकणाऱ्या संभाव्य आर्थिक आणि संसाधनांच्या टंचाईला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने आधीच देशपातळीवर पावले उचलली आहेत. याच पार्श्वभूमीवर, मा. पंतप्रधानाच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि व्यापक शासन परिपत्रक जारी केले आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आलेल्या या परिपत्रकातून, प्रशासकीय स्तरावर दूरगामी बदल घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

हा केवळ एक प्रशासकीय आदेश नसून, संकटसमयी संसाधनांचे संवर्धन आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारा एक महत्त्वपूर्ण आराखडा आहे. या परिपत्रकातील प्रमुख मुद्दे आणि त्याचे संभाव्य सकारात्मक परिणाम खालीलप्रमाणे आहेत:

१. इंधन बचत आणि शाश्वत वाहतुकीला प्राधान्य पश्चिम आशियातील संकटामुळे सर्वात मोठा फटका इंधन पुरवठ्याला बसू शकतो. हे ओळखून शासनाने वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदलांचे संकेत दिले आहेत:

■ **इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य:**

बाह्यस्त्रोतांकडून (outsourcing) घेण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये इलेक्ट्रीक वाहनांना प्राधान्य दिले जाईल. तसेच चार्जिंग सेंटर्स उभारण्याच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन वीज दर कमी करण्याबाबत विचार केला जाईल.

पब्लिक ट्रान्सपोर्ट आणि कारपूलिंग:

शासकीय अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामासाठी आणि एकत्रित दौऱ्यांसाठी `कारपूलिंग` (Carpooling) व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा सार्वजनिक बसने प्रवास करणे आवश्यक केले आहे.

■ **मिरवणुकांवर बंदी:**

इंधनाचा अपव्यय टाळण्यासाठी पोलीस विभागाने कोणत्याही बाईक रॅली, वाहनांच्या मिरवणुका किंवा मोठ्या ताफ्यांना परवानगी देऊ नये, असे स्पष्ट निर्देश आहेत.

२. आर्थिक शिस्त आणि परकीय चलनाचे संवर्धन जागतिक मंदी आणि संकटकाळात राज्याची तिजोरी आणि देशाचे परकीय चलन सुरक्षित ठेवण्यासाठी कडक पावले उचलली गेली आहेत:

■ **परदेश दौरे रद्द:**

शासकीय अधिकाऱ्यांचे अभ्यास किंवा शासकीय कामासाठीचे मंजूर असलेले सर्व परदेश दौरे रद्द करण्यात आले असून नवीन दौऱ्यांच्या नियोजनावर बंदी घालण्यात आली आहे.

सल्लागारांच्या नेमणुकीला ब्रेक:

पुढील ६ महिन्यांसाठी कोणत्याही प्रशासकीय विभागात नवीन सल्लागारांची (Consultants) नेमणूक न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ज्यामुळे अनावश्यक आर्थिक भार टळेल.

■ **डिजिटल बैठकांवर भर:**

मंत्रालय, विभाग आणि जिल्हा पातळीवरील सर्व बैठका, सेमिनार आणि प्रशिक्षणे आता व्हीसी (Video Conferencing) किंवा ऑनलाइन पद्धतीनेच होतील. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही याचे पालन करणे बंधनकारक आहे.

३. ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धन शासकीय कार्यालयांपासून ते सामान्यांच्या घरांपर्यंत ऊर्जेची बचत करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे:

■ **कार्यालयांमध्ये ऊर्जा बचत:**

कार्यालयीन वेळेत नैसर्गिक प्रकाशाचा वापर वाढवणे, काम संपताच दिवे, पंखे, संगणक, एसी आणि लिफ्ट बंद करणे बंधनकारक राहील. तसेच एसीचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअसवर ठेवण्याचे निर्देश आहेत.

सौरऊर्जेला गती:

"प्रधानमंत्री सूर्यघर" योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त घरांवर सौरऊर्जा यंत्रणा बसवण्यावर भर दिला जाईल.

■ **बॅनर आणि होर्डिंग्जवर मर्यादा:**




शासकीय जाहिराती माफक प्रमाणात करून अनावश्यक खर्च टाळला जाईल. फ्लेक्स, बॅनर आणि डेकोरेटिव्ह लाईट्सचा वापर कमी केला जाईल आणि होर्डिंग्जसाठी डीजी सेट (जनरेटर) वापरण्यास मनाई असेल.

४. अन्न सुरक्षा, पीएनजी आणि कृषी क्षेत्रातील सुधारणा संसाधनांच्या योग्य वापरासाठी थेट नागरिकांच्या जीवनशैलीशी जोडलेले निर्णय यात समाविष्ट आहेत:

■ **खाद्यतेलाचा तर्कसंगत वापर:**

कॅन्टीन, मध्यान्ह भोजन, हॉस्टेल्स, तुरुंग आणि रुग्णालयांच्या मेन्यूमध्ये बदल करून खाद्यतेलाचा वापर कमी केला जाईल. आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविकांमार्फत घराघरांमध्ये समुपदेशन केले जाईल. तसेच आयात होणाऱ्या पाम किंवा सूर्यफूल तेलाऐवजी स्वदेशी मोहरी आणि शेंगदाणा तेलाला प्रोत्साहन दिले जाईल.

■ **पीएनजी (PNG) चा विस्तार:**

हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना अनिवार्यपणे पीएनजी वापरण्यास प्रवृत्त केले जाईल आणि प्रलंबित पीएनजी जोडण्यांना तातडीने मंजुरी दिली जाईल.

■ **उज्ज्वला योजनेचे शुद्धीकरण:**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना आणि सर्वसाधारण ग्राहकांमधील बोगस, दुबार किंवा स्थलांतरित ग्राहकांची नोंदणी रद्द करून खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत गॅस पोहोचवला जाईल.

■ **नैसर्गिक शेतीला बळ:**

रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी आणि युरियाचा गैर-शेती कामांसाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी कृषी विभाग मोठी मोहीम राबवणार आहे. माती परीक्षणावर आधारित पीक पद्धती आणि नैसर्गिक/सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले जाईल.

■ **निष्कर्ष:-**

महाराष्ट्र शासनाचे हे परिपत्रक केवळ तात्पुरती मलमपट्टी नसून, भविष्यातील मोठ्या संकटाला तोंड देण्याची पूर्वतयारी आहे. प्रशासकीय खर्चात कपात करणे, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि स्वदेशी संसाधनांवर भर देणे यांमुळे राज्याला आर्थिक स्थैर्य लाभेल.

मंत्रालयीन विभागांपासून ते अगदी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आणि पोलिसांपर्यंत सर्वांना या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याचे पालन करणे ही जबाबदारी केवळ प्रशासकीय यंत्रणेचीच नव्हे, तर आता गरज आहे ती नागरिकांच्याही सक्रिय सहभागाची. जर आपण सर्वांनी मिळून या सूचनांचे पालन केले, तर हे `संकट` आपण एका नव्या `संधीत` बदलू शकू, यात शंका नाही.

चला तर आपल्यासाठी, आपल्या कुटुंबासाठी, आपल्या समाजासाठी, आपल्या राज्यासाठी आणि आपल्या राष्ट्रासाठी पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देवून राष्ट्राप्रति आपले राष्ट्रप्रेम सिद्ध करू या..! वैचारिक आणि प्रत्यक्ष कृतीतून सक्रिय योगदान देवू या...!

■ **- मनोज सुमन शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे/रायगड तथा उपसंचालक (माहिती) (अ.का)
कोकण विभागीय माहिती कार्यालय, बेलापूर, नवी मुंबई

## लोकार्थ

# आर्थिक वर्ष 2026 मध्ये पीएफसी ग्रुपचा नफा रु. 33,625 कोटींवर

पॉवर फायनानास कंपनी अर्थात पीएफसीने नुकतेच आपले २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे निकाल घोषित केले. ग्रुप १२.४० लाख कोटींहून अधिक एकूण ताळेबंद आकारासह भारतातील सर्वात मोठा एनबीएफसी ग्रुप म्हणून कायम आहे.पीएफसी समूहाची एकत्रित निव्वळ मालमत्ता (अल्प-नियंत्रणकारी हिश्श्यासह) १२% ने वाढली आहे ३१.०३.२०२५ रोजी हि मालमत्ता रु. १,५५,१५६ कोटींवरून ३१.०३.२०२६ रोजी रु. १,७३,४४१ कोटींवर. पोहचली आहे. एकत्रित एकूण अनुत्पादक मालमत्ता १% च्या खाली पोहोचली असून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ०.६६% आहे, जी आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १.६४% होती. सक्रिय निराकरण प्रयत्नांमुळे, एकत्रित निव्वळ अनुत्पादक मालमत्ता आर्थिक वर्ष २०२५ मधील ०.३८% वरून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ०.१३% या नीचांकी पातळीवर पोहोचली आहे.आर्थिक वर्ष २०२६ मध्ये रु. २०,०५१




कोटींचा आतापर्यंतचा सर्वाधिक वार्षिक निव्वळ नफा (PAT) नोंदवला गेला, जो आर्थिक वर्ष २०२५ मधील रु. १७,३५२ कोटींच्या तुलनेत १६% नी वाढला आहे. यामुळे, पीएफसी भारतातील सर्वाधिक नफा कमावणारी बिगर-बँकिंग वित्तीय कंपनी म्हणून कायम आहे. संचालक मंडळाने प्रति शेअर रु. ३.९५ चा अंतिम लाभांश प्रस्तावित केला आहे. यामुळे, पीएफसीने आर्थिक वर्ष २०२६ साठी प्रति शेअर एकूण रु. १८.५५ चा लाभांश दिला आहे.

# बजाज समूहाचा शंभर वर्षे पूर्ण गौरवशाली प्रवास




राष्ट्रनिर्मितीमध्ये बजाज समूहाच्या योगदानाची दखल घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बजाज परिवाराला दिलेल्या संदेशात म्हटले आहे की, "बजाज समूहाच्या शताब्दी निमित्त, मी या प्रवासाशी जोडल्या गेलेल्या प्रत्येकाचे अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देतो. १०० वर्षांचा प्रवास हा कोणत्याही संस्थेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. हे केवळ दीर्घायुष्याचे प्रतीक नसून बदलत्या काळानुसार स्वतःला जुळवून घेण्याच्या, आर्थिक विकासात योगदान देण्याच्या आणि पिढ्यानपिढ्या आपली प्रासंगिकता टिकवून ठेवण्याच्या क्षमतेचे दर्शन घडवते."

"श्री जमनालाल बजाज यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेला बजाज समूह आपल्या देशाच्या विकासाच्या अनेक टप्प्यांवर भारताच्या औद्योगिक आणि आर्थिक परिदृश्याचा अविभाज्य भाग राहिला आहे. आज हा समूह एक वैविध्यपूर्ण कंपनी म्हणून विस्तारला असून भारत आणि जगभरातील ग्राहकांना सेवा देत आहे." US$ १४८ अब्ज इतक्या मार्केट कॅपसह भारतातील सर्वात मोठ्या उद्योग समूहांपैकी एक असलेला बजाज समूह, ऑटोमोबाईल, आर्थिक सेवा, ग्राहक उपयोज्य विद्युत उपकरणे आणि इंजिनिअरिंग या क्षेत्रांच्या माध्यमातून भारतातील प्रत्येक ३ पैकी १ घराला आपली सेवा देत आहे. बजाज समूहाची पाळेमुळे त्याचे संस्थापक जमनालाल बजाज यांच्याशी जोडलेली आहेत.

# जिओस्टारच्या जोरावर टाटा आयपीएलची सर्वाधिक पोहोच

टाटा आयपीएल २०२६ मधील संघ प्ले-ऑफसाठीच्या रोमांचक शर्यतीत उतरत असताना, जिओस्टार लिनियर टीव्ही आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर पोहोच आणि सहभागामध्ये सातत्यपूर्ण वाढ अनुभवत आहे. प्लेऑफमधील जागांसाठी अजूनही मोठी स्पर्धा असल्याने, १९ व्या हंगामात अनिश्चितता कायम राहिली आहे, ज्यामुळे टाटा आयपीएल २०२६ ने आतापर्यंतची सर्वाधिक पोहोच नोंदवली आहे, जी एकूण १.१ अब्ज आहे.

लिनियर टीव्हीवरील पोहोचने आपली मजबूत स्थिती कायम ठेवली आहे आणि ५० कोटींच्या टप्प्याकडे वाटचाल करत आहे, तर डिजिटल पोहोचमध्ये १५% वाढ झाली आहे आणि पाहण्याचा वेळ (वॉच-टाइम) ७% ने वाढला आहे. सीटीव्हीच्या पोहोचमध्ये २५% वाढ झाली आहे आणि पाहण्याचा वेळ २०% ने वाढला आहे. प्रादेशिक भाषेतील पाहण्याच्या वेळेत तब्बल ४२% वाढ झाली आहे. ही आकडेवारी विविध प्लॅटफॉर्म, उपकरणे आणि फॉरमॅटमध्ये टाटा आयपीएलच्या प्रेक्षकांमध्ये होणारी सातत्यपूर्ण वाढ दर्शवते.




संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, रविवार 17 मे 2026

Last page

# नगरसेविका सौ. शिल्पा जयपाल लाहोटी यांच्या मान्सूनपूर्व नालीसफाईच्या मागणीला यश

## जयपाल लाहोटी यांच्या पुढाकारातून प्रत्यक्ष सफाई कामाला सुरुवात





**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांमध्ये तसेच प्रभाग क्रमांक १३ मधील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ, घाण व कचरा साचल्याने पावसाळ्यात नाल्याचे पाणी रस्त्यावर येऊन नागरिक व वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः मोंढा बाजार समिती परिसर व खाडी नाला परिसरातील समस्या गंभीर स्वरूप धारण करत असल्याने मान्सूनपूर्व नालीसफाई तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका सौ. शिल्पा जयपाल लाहोटी यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली होती.

नगरसेविका सौ. शिल्पा जयपाल लाहोटी यांच्या मागणीची नगर परिषद प्रशासनाने तात्काळ दखल घेत प्रभाग क्रमांक १३ मधील खाडी नाला तसेच मोठ्या नाल्यांच्या सफाईच्या कामाला सुरुवात केली आहे. यावेळी जयपाल लाहोटी, माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी व भावड्या कराड,नगरसेवक हाजीबाबु व रमेश पवार यांच्या उपस्थितीत सफाई मोहिमेला प्रारंभ करण्यात आला.

मान्सूनपूर्व साफसफाईमुळे पावसाळ्यात नागरिकांना होणाऱ्या त्रासातून मोठा दिलासा मिळणार असून साचलेले पाणी, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या कमी होण्यास मदत होणार आहे. नगर परिषद प्रशासनाकडून सफाईसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून मोठ्या संख्येने कर्मचारी कामावर तैनात करण्यात आले आहेत.

नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने वेळेत सुरू करण्यात आलेल्या या कार्यवाहीचे परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# 20 मे रोजी देशभरातील मेडिकल दुकाने राहणार बंद?

## 12.4 लाख औषध विक्रेत्यांचा देशव्यापी संप

**परळी | प्रतिनिधी**

देशभरातील औषध विक्रेत्यांनी २० मे रोजी देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. या संपात १२.४ लाखांहून अधिक औषध विक्रेते आणि औषध वितरक सहभागी होणारा असल्यामुळे परिणामी, २० मे रोजी देशाच्या अनेक भागांमध्ये औषधांची दुकाने बंद ठेवण्यात आली आहे हा संप ऑल इंडिया केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स असोसिएशनने (AIOCD) पुकारला असून ऑनलाइन फार्मसी प्लॅटफॉर्म आणि मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या धोरणांमुळे पारंपरिक औषध व्यवसायावर परिणाम होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

लाखो औषध विक्रेत्यांची संपाची हाक ही ई-फार्मसीच्या वाढत्या आणि अनियंत्रित व्यवसायाचा निषेध करण्यासाठी 'ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स' या संघटनेने २० मे रोजी देशव्यापी पुकारलेल्या संपात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे. या दिवशी देशभरातील सर्व औषध दुकाने आणि वितरक आपली प्रतिष्ठाने बंद ठेवणार असून यामध्ये सुमारे १२.४ लाखांहून अधिक केमिस्ट आणि औषध वितरकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संघटनेने, ऑनलाइन फार्मसीच्या अनियंत्रित कामकाजामुळे लहान औषध विक्रेत्यांच्या अस्तित्वासमोर गंभीर धोका निर्माण झाल्याचा दावा करत या संपाच्या माध्यमातून औषध विक्रेते आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधणार असून, या







देशव्यापी बंदमुळे औषध पुरवठ्यावर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

बनावट आणि निकृष्ट औषधांच्या धोक्यावरून पुकारलेला हा लढा असून देशातील रुग्णांना बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या औषधांचा वाढता धोका लक्षात घेता, ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट तसेच महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीनं २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक देण्यात आली आहे. या हाकेला प्रतिसाद देत परळी केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने देशव्यापी बंदमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतलेला असून या बंदमध्ये औषधी पुरवठादार व विक्रेते यांनी सहभागी व्हावे असे परळी केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे

# परळीतील 'राजमाता जिजाऊ महिला बचत गट'चा आदर्श उपक्रम; दशकपूर्तीनिमित्त सदस्यांना 1 ग्रॅम सोन्याचे वाटप



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहरातील शिवाजीनगर, नाथ टॉकीज मागील परिसरात कार्यरत असलेल्या राजमाता जिजाऊ महिला बचत गटाने सामाजिक, आर्थिक आणि महिलांच्या सक्षमीकरणाच्या क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. दिनांक ५ मे २०१६ रोजी स्थापन झालेला हा बचत गट आज दशकपूर्तीकडे यशस्वी वाटचाल करत असून, महिलांच्या आर्थिक उन्नतीसह कौटुंबिक, शैक्षणिक व व्यावसायिक समस्यांच्या निराकरणासाठी प्रभावी माध्यम ठरत आहे.

नगर परिषद नोंदणीकृत व डीआरडी अंतर्गत कार्यरत असलेल्या या बचत गटामध्ये सदस्यांकडून दरमहा २०० रुपयांची नियमित बचत केली जाते. बचत गटाच्या माध्यमातून सदस्यांना २ लाख रुपयांपर्यंत केवळ १ टक्का व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. विशेष म्हणजे सर्व सदस्य नियमितपणे कर्जफेड करत असल्याने गटाची आर्थिक शिस्त आणि विश्वासार्हता अधिक बळकट झाली आहे.

या बचत गटातील सर्व आर्थिक व्यवहार धनादेशाद्वारे पारदर्शक पद्धतीने केले जातात. तसेच सर्व व्यवहारांचे मार्गदर्शन व लेखापरीक्षण सी.ए. गजानन माने यांच्या सल्ल्यानुसार करण्यात येत असल्याने गटाच्या कारभारात पारदर्शकता व शिस्त दिसून येते.

राजमाता जिजाऊ महिला बचत गटाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक उल्लेखनीय उपक्रम राबविले आहेत. सदस्यांना वेळोवेळी लाभांश स्वरूपात आर्थिक मदत तसेच सोन्याचे वाटप करण्यात येते. दशकपूर्ती निमित्त नुकतेच सर्व सदस्यांना १ ग्रॅम सोन्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात बचत गटाविषयी मोठी सकारात्मक चर्चा होत असून, इतर बचत गटांसाठीही हा गट प्रेरणादायी ठरत आहे.

बचत गटाचे कार्य गटाच्या सचिव शिल्पा दीपक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगतीपथावर असून महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबनाची भावना निर्माण करण्यासाठी हा गट सातत्याने कार्यरत आहे. या बचत गटाच्या अध्यक्षा सुनिता दीपक धुमाळ, उपाध्यक्षा प्रेमीला शिवाजी कदम आणि सचिव शिल्पा दीपक शिंदे या जबाबदारीने कार्य पाहत आहेत. तसेच प्रगती कदम, शिवकन्या शिंदे, सुवर्णा मुंडे, रेखा झाटे, अरुणा रोकडे, सुनंदा जाधव, कांता पंचाक्षरी, संगीता सोळंके, विमल साखरे, शिवगंगा होळकर, शेषीकला धुमाळ आणि भागीरथी झाटे या सदस्यांच्या सक्रिय सहभागामुळे गटाची वाटचाल अधिक सक्षम बनली आहे.

महिलांच्या बचतीतून सामाजिक परिवर्तन घडवून आणणारा राजमाता जिजाऊ महिला बचत गट हा परळी शहरासाठी अभिमानास्पद ठरत असून, "महिला बचत गट म्हणजे केवळ बचत नव्हे तर स्वावलंबनाचा मजबूत पाया हे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे.

# आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथील मुकादम पोपट सानप यांचे निधन



**आष्टी | प्रतिनिधी:**

आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथील रहिवासी आणि साखर कारखान्याला ऊसतोड मजूर पुरवणारे प्रसिद्ध मुकादम पोपट नाथा सानप (वय 60 वर्षे) यांचे शुक्रवार, दिनांक १५ मे रोजी अहिल्यानगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखाद निधन झाले. त्यांच्या निधनाने 9कासेवाडी परिसरासह मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी पोपट सानप यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता. त्यामुळे त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. पोपट सानप यांनी अनेक वर्षे साखर कारखान्यांना ऊसतोड मजूर पुरवण्याचे (मुकादम म्हणून) काम केले होते. या व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी अनेक गरीब कुटुंबांना रोजगाराचे साधन मिळवून दिले होते. अत्यंत शांत, संयमी व मनमिळावू स्वभाव यामुळे त्यांचा सर्वत्र मोठा जनसंपर्क आणि परिचय होता. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच कासेवाडी गावावर शोककळा पसरली. त्यांचे पार्थिव कासेवाडी येथे आणल्यानंतर, शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह, त्यांचे नातेवाईक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी साश्रू नयनांनी त्यांना अंतिम निरोप दिला.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुले, मुली आणि भाऊ असा मोठा आप्तपरिवार आहे.